**प्रेसनोट** **दिनांक – १९/०३/२०२४**

# पिंपरी चिंचवड पोलीसांची संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी उजगरे टोळी, आहिरराव टोळी या टोळयांवर "मोका अंतर्गत कारवाई "

आगामी लोकसभा निवडणुकांचे पार्श्वभुमीवर मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी लोकसभा निवडणुक हया भयमुक्त व पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पाडता याव्यात यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ०६ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण ३० आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) भोसरी पोलीस स्टेशन गु.रजि.नं १७/२०२४ भादवि कलम ३९४,३४, आर्म अॅक्ट ४(२५) क्रि.लॉ.अॅमे.अॅक्ट कलम ३च ७ महा.पो.कायदा कलम ३७(१)१३५** या गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे **१) पवन छगन उजगरे (टोळी प्रमुख)** रा.भोसरी पुणे **२) सुनिल जनार्दन सकट,** वय ३२ वर्षे, रा. विठ्ठल नगर, अण्णाभाऊ साठे कमानीच्या आत, लांडेवाडी, भोसरी पुणे **३) दिपक रामकिसन हजारे,** वय २७ वर्षे, रा. वय २७ वर्षे, रा. विठ्ठल नगर, अण्णाभाऊ साठे कमानीच्या जवळ, लांडेवाडी, भोसरी पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०६ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**२) वाकड पोलीस स्टेशन, गु.रजि.नं. १९४/२०२४ भादवि. ३०८, ३२३, ५०६, ३४, आर्म अॅक्ट ४(२५), महा.पो.का. क. ३७(१)(३) सह १३५** या गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे **१) आदित्य ऊर्फ निरंजन शाम आहिरराव (टोळी प्रमुख)** वय ३१ वर्षे, रा. भक्ती कॉम्प्लेक्स समोर,संस्कृती निवास, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे **२) प्रतिक अशोक माने,** वय २० वर्षे, रा. हवेली कॉम्प्लेक्स, श्रीनगर, थेरगाव, पुणे ३) **प्रेम संदीप तरडे,** वय १९ वर्षे, रा. लक्ष्मीदीप सोसायटी, वीर हॉस्पीटल समोर, काळेवाडी पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण १० गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

वरील दोन्ही **टोळी प्रमुख** यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **भोसरी, वाकड, सांगवी,चतुश्रृंगी, सोलापुर, अहमदनगर** पोलीस स्टेशन हद्दीत **खुनाचा प्रयत्न, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दरोडा, जबरी चोरी, चोरी, दुखापत, दंगा, मारामारी, बेकायदेशीररित्या जिवघेणी हत्यारे/ अग्निशस्त्रे जवळ बाळगणे** अशा प्रकारेचे गंभीरे स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन टोळी प्रमुखाने गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.संदिप डोईफोडे (गुन्हे), मा.पोलीस उप-आयुक्त श्री.बापु बांगर (परि-०२) मा.पोलीस उप-आयुक्त स्वप्ना गोरे मॅडम (परि-०१), मा.सहा.पोलीस आयुक्त सतिश माने (गुन्हे),मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.विशाल हिरे (वाकड विभाग) यांच्या मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक श्री.विठ्ठल साळुंखे, (वाकड पोस्टे), पोलीस निरीक्षक श्री.अनिल देवडे (पी.सी.बी गुन्हे शाखा), सपोनि अंबरीष देशमुख, पोउपनि सुहास खाडे (भोसरी पो.स्टे), पोउपनि सुहास पाटोळे (वाकड पो.स्टे) तसेच अंमलदार अंमलदार पो.हवा. सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकप्पा कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, यांच्या पथकाने केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय